PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sasurwashin
Year: 1978

Song: Chal Ga Saye Chal Chal Baai
Lyricist: Shanta Shelke, Chintamani Potdar

चल गं सये चल चल बाई
गौराई आल्यात सोन्याच्या पायी
गौराई आल्यात सोन्याच्या पायी
गौराई आल्यात सोन्याच्या पायी
गौराई तुमची पुण्याई मोठी
चढून यावं अंगण ओटी
गौराई तुमची पुण्याई मोठी
चढून यावं अंगण ओटी
तुमच्या सांगाती लक्ष्मी येई
तुमच्या सांगाती लक्ष्मी येई
चल गं सये चल चल बाई
गौराई आल्यात सोन्याच्या पायी
गौराई आल्यात सोन्याच्या पायी

गौराई तुमचे पाऊल ठसे
घरात दारात उठले कसे
गौराई तुमचे पाऊल ठसे
घरात दारात उठले कसे
सुखाची बरसात अवघ्या ठायी
सुखाची बरसात अवघ्या ठायी
चल गं सये चल चल बाई
गौराई आल्यात सोन्याच्या पायी

गौराई कोठीत पाऊल ठेवा
धान्यानं कुणग्या भरून जावा
गौराई कोठीत पाऊल ठेवा
धान्यानं कुणग्या भरून जावा
धनाला आता कमती नाही
धनाला आता कमती नाही
चल गं सये चल चल बाई
गौराई आल्यात सोन्याच्या पायी

स्वैपाक घरात गौराई बसा
चुलीला द्यावा अन्नाचा वसा
स्वैपाक घरात गौराई बसा
चुलीला द्यावा अन्नाचा वसा
सुखाचा घास मुखात जाई
सुखाचा घास मुखात जाई
चल गं सये चल चल बाई
गौराई आल्यात सोन्याच्या पायी

हातात चुडा कपाळी कुंकू
तुमच्या कृपेने काळाला जिंकू
हातात चुडा कपाळी कुंकू
तुमच्या कृपेने काळाला जिंकू
झुकते पायी ठेवते डोई
झुकते पायी ठेवते डोई
चल गं सये चल चल बाई
गौराई आल्यात सोन्याच्या पायी

काकणं काकणं माझं मोत्याचं काकणं
काकणं काकणं माझं मोत्याचं काकणं
नवखडी मारीत हिरव्या साडीत
नांदणं नांदणं
मला अंबाबाईची राखण
नवखडी मारीत हिरव्या साडीत

नांदणं नांदणं
मला अंबाबाईची राखण
काकणं काकणं माझं मोत्याचं काकणं

सये बाई सांगू काही
देवी अशी पूजिली
सयेबाई सांगू काही
देवी अशी पूजिली
पती माझा देवराजा
स्वर्गसुखं लाजली
पती माझा देवराजा
स्वर्गसुखं लाजली
सयेबाई सांगू काही
देवी अशी पूजिली
माझं सासर सासर
भर चौकात मोठा वाडा
माझं सासर सासर
भर चौकात मोठा वाडा
आंबेराईचं राईचं
सुख पिकून आलाया पाडा
आंबेराईचं राईचं
सुख पिकून आलाया पाडा
माझं सासर सासर
भर चौकात मोठा वाडा
माझं सासर सासर
भर चौकात मोठा वाडा
माझं सासर सासर
भर चौकात मोठा वाडा
माझं सासर सासर
भर चौकात मोठा वाडा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*